# सोलापूर विद्यापीठ

**अभ्यासमंडळे विभाग**

सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर. ४१३ २५५

ईपीएबीक्स : ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स)

विस्तृत क्र. ११३ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०

संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in

ई-मेल : bcud@sus.ac.in / bos@sus.ac.in

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# Solapur University

**Board of Studies**

Solapur-Pune National Highway,
Kegaon, Solapur-413 255
EPABX No. 0217- 2744778 (11 lines)
Ext. No. 113. Fax No.0217-2744770
Website : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
E-mail : bcud@sus.ac.in / bos@sus.ac.in


संदर्भ क्र. सोविसो/अमंवि/२०१८/8038 दिनांक : 15 SEP 2018

प्रति,

मा. प्राचार्य,

सर्व संलग्नित अभियांत्रिकी, फॉर्मसी व आर्किटेक्चर महाविद्यालये,

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ किंवा त्यापूर्वी अभियांत्रिकी/फार्मसी/आर्किटेक्चर अभ्यासक्रमास प्रवेशित असून सद्यस्थितीत अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत.**

संदर्भ
१ दि. ०६/०९/२०१८ रोजी मा.सहयोगी अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्व अभियांत्रिकी अभ्यासमंडळाचे अध्याक्ष/समन्वयक, यंत्रणा विश्लेषक परीक्षा विभाग, उपकुलसचिव परीक्षा विभाग यांच्या संयुक्त बैठकीत ठराव क्र. १ ते ३

२ दि.०७/०९/२०१८ रोजी झालेल्या सर्व विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता तसेच परीक्षा विभागातील यंत्रणा विश्लेषक, उपकुलसचिव यांची संयुक्त बैठकीतील ठराव क्र.२.

३ मंजूर कार्यालयीन टिपणी दि. ११/०९/२०१८.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन दि. ०६/०९/२०१८ रोजी झालेल्या मा.सहयोगी अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्व अभियांत्रिकी अभ्यासमंडलाचे अध्याक्ष/समन्वयक, यंत्रणा विश्लेषक परीक्षा विभाग, उपकुलसचिव परीक्षा विभाग यांच्या संयुक्त बैठकीत खालीलप्रमाणे ठराव क्र. १ ते ३ पारित झालेले आहेत.

| | |
|---|---|
| ठराव क्र. १ | जे विद्यार्थी शै. वर्ष २०१२-१३ किंवा त्यापूर्वी प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास, फॉर्मसी अभ्यासक्रमास किंवा ऑर्किटेक्चर या अभ्यासक्रमास प्रवेशीत असून काही विषयात अनुत्तीर्ण झालेले आहेत. तसेच शै. वर्ष २०१३-१४ मध्ये अभियांत्रिकी /फॉर्मसी अभ्यासक्रमास थेट द्वितीय वर्षास प्रवेशीत असून काही विषयात अनुत्तीर्ण झालेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्वीच्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देण्यासाठी ऑक्टोबर/नोव्हेंबर - २०१८ आणि मार्च / एप्रिल -२०१९ या शेवटच्या दोन संधी देण्यात याव्यात व तद्नंतर सदर विषयांची परीक्षा विद्यापीठाकडून घेण्यात येवू नये, असे ठरले. |
| ठराव क्र. २ | अभियांत्रिकीमध्ये येणाऱ्या सर्व अभ्यासमंडळानी अभ्यासक्रम सुधारीत करताना पूर्वीच्या सर्व अभ्यासक्रमाच्या विषयांचे समकक्ष विषय देणे अनिवार्य आहे. कोणत्याही विषयासाठी No Equivalence असे नमूद करु नये, असे ठरले. |
| ठराव क्र. ३ | शै.वर्ष २०१८-१९ मध्ये अभियांत्रिकी भाग-१ चा अभ्यासक्रम सुधारीत केलेला असल्याने शै.वर्ष २०१७-१८ व त्यापूर्वी प्रवेश घेतलेल्या तथा अभियांत्रिकी भाग-१ मध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑक्टोंबर / नोव्हेंबर २०१८ आणि मार्च / एप्रिल -२०१९ या शेवटच्या दोन संधी देण्यात याव्यात व तद्नंतर सदर विषयांची परीक्षा विद्यापीठाकडून घेण्यात येवू नये, असे ठरले. |

उपरोक्त ठरावानुसार कार्यवाही करण्याबाबतची बाब दि.०७/०९/२०१८ रोजी झालेल्या सर्व विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता तसेच परीक्षा विभागातील यंत्रणा विश्लेषक, उपकुलसचिव यांची संयुक्त बैठकीत ठराव क्र.२. अन्वये स्विकारण्यात आलेले आहेत.

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१२-१३ किंवा त्यापूर्वी अभियांत्रिकी / फार्मसी / आर्किटेक्चर अभ्यासक्रमास प्रवेशित असून सद्यस्थितीत अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्या संदर्भात उपरोक्त ठराव क्र.१, २, ३ नुसार कार्यवाही (अंमलबजावणी) करण्यात यावी. तसेच सदरची माहिती संबंधित विद्यार्थ्यांच्या निर्दशनास संबंधित महाविद्यालयाने आणावे हि विनंती.

आपला विश्वासू,

प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील
विशेष कार्यासन अधिकारी
शैक्षणिक, संशोधन आणि विकास